## || श्री गजानन विजय ग्रंथ ||

## अध्याय एकवीसावा

|| श्रीगणेशाय नमः || जय जयाजी अनंतवेषा । जय जयाजी अविनाशा । जय जयाजी परेशा । ब्रह्मांडाधीशा नमो तुशीं ॥१॥ देवा तूं आपणांस । पतितपावन नाम खास । सर्वदा आहे धरिलेंस । याचा विचार करीं गा ॥२॥ पाप्यावरी प्रेम अमित । तुझें देवा असतें सत्य । पापीजनांनीं तुजप्रत । महत्त्व आणिलें कृपाळा ॥३॥ म्हणून माझ्या पातकासी । पाहूं नका हो हृषीकेशी । धुणें येतें जलापासीं । स्वच्छ होतें म्हणून ॥४॥ म्हणून पतितांचा कंटाळा । करुं नको रे घननीळा । काय भूमीनें सांवरिला । दिलें आहे टाकून ॥५॥ तूंच पतितपावन । तूंच पुण्यपावन । या दोन्ही दोषांपासून । तुम्ही अलग सर्वदा ॥६॥ सूर्य नाशी तमाप्रत । म्हणून कां तो कष्टी होत । कांहीं न करावें लागत । तम नासण्या रवीशीं ॥७॥ तम जों जों भेटण्या येई । तों तों तेथें प्रकाश होई । अंधारत्व अवघें जाई । त्याचें तमाचें नारायणा ॥८॥ पापपुण्याची वासना । तूंच उपजविशी नारायणा । आपला रक्षण्या मोठेपणा । पापी तूंच निर्मिशी ॥९॥ कांहीं असो आतां तरी । चिंता रहित मजला करी । दासगणू हा घ्यावा पदरीं । हेंच आहे मागणें ॥१०॥ तुझ्यावांचून मजप्रत । नाहीं वशिला जगतांत । अवघेंच तुझ्या हातांत । आहे कीं रे पांडुरंगा ॥११॥ श्रोते आतां सावधान । हा कळसाध्याय परिसा पूर्ण । तुमचें भाग्य धन्य धन्य । संतकथा ऐकतसां ॥१२॥ एकविधा निष्ठा ज्याची । जडली गजाननपदीं साची । त्याच्या दुःखसंकटांची । होळीच होते निःसंशय ॥१३॥ बांधीत असतां मंदिर । काम करीत शिखरावर । एक होता मजूर । हाताखालीं गवंडयांच्या ॥१४॥ तो धोंडा देतां मिस्तरीला । एकाएकीं झोक गेला । तीस फुटांवरुन पडला । खालीं घडीव दगडावर ॥१५॥ तो पडतां लोकांनीं पाहिला । जन म्हणती मेला मेला । उंचावरुन खालीं

पडला। आतां कशाचा वांचे तो ? ॥१६॥ परी घडलें अघटित। कोठें न लागलें त्याप्रत। जैसा चेंडू झेलितात। तैसें त्यांचें जाहलें ॥१७॥ सोपानसाह्यें ज्यापरी। जन उतरती भूमीवरी। तेथें झालें त्याचपरी। त्या मजुराकारणें ॥१८॥ मजूर म्हणे लोकांला। माझा जेव्हां झोक गेला। तेव्हां एकानें धरलें मला। पडतां पडतां करास ॥१९॥ पाय भूमीसी लागतां क्षणीं। तो न दिसला मजलागुनी। हें वृत्त ऐकुनी। लोक अवघे आनंदले ॥२०॥ अभिश्राप कोणाचा। समर्थ ना घेती साचा। हा योग पडण्याचा। दैवानेंच आला तुज ॥२१॥ या तुझ्या पडण्यानें। स्पर्श केला समर्थानें। तुझ्या कराकारणें। ऐसें भाग्य कोणाचें ? ॥२२॥ असो एक बाई रजपुताची। जयपुराहून आली साची। बाधा होती भूताची। तया अबलेकारणें ॥२३॥ तिसी जयपूर ग्रामाला। दत्तात्रयाचा दृष्टान्त झाला। तूं या रामनवमीला। जाई शेगांवाकारणें ॥२४॥ तेथें संत जागती ज्योत। श्रीगजानन सद्गुरुनाथ। ते या तुझ्या पिशाच्याप्रत। मुक्ति देतील निःसंशयें ॥२५॥ या दृष्टान्तेंकरुन। आपुल्या दोन मुलांसी घेऊन। रामनवमीसाठीं जाण। बाई आली शेगांवा ॥२६॥ प्रतिपदेपासून भला। उत्सवासी आरंभ झाला। अफाट समुदाय मिळाला। नवमीस श्रोते शेगांवीं ॥२७॥ काम सभामंडपाचें। चाललें होतें तेथ साचें। खांब मोठमोठे दगडाचे। उभे केले असती ॥२८॥ दीड फूट जाडीचा। पांच फूट लांबीचा। प्रत्येक खांब दगडाचा। ऐसे होते किती तरी ॥२९॥ उत्सवाच्या निमित्त भलें। काम भक्तांनीं बंद केलें। खांब होते बसविलेले। नुसते मात्र ते ठाई ॥३०॥ श्रीरामाचा जन्म झाला। प्रसादासाठीं लोटला। जनांचा तो समुदाय भला। तो न मसी वर्णवे ॥३१॥ त्या गर्दीत ही बाई। उभी खांबास एक्या पायीं। होती तिला सोसली नाहीं। गर्दी ती यत्किंचित ॥३२॥ म्हणून खांबाच्या आश्रया। गेली निर्भय व्हावया। गर्दी ती चुकवावया। परी झालें विपरीत ॥३३॥ तोच खांब कोसळला। तिच्या शरीरा पडला। तो पहातां लोकांला। ऐसें वाटूं लागलें ॥३४॥ तिचा बहुतेक गेला प्राण। ही बाई कोठील कोण ?। लहान मुलें दिसतीं दोन। खांबाखालीं येधवां ॥३५॥ दहावीस जणांनीं। खांब काढिला अंगावरुनी। पाणी मुखांत

घालोनी । लोबोकडे पाठविलें ॥३६॥ ही लोबो डॉक्टरीण । शस्त्रविद्येंत अतिप्रवीण । ही जातीनें ख्रिश्चन । भक्त येशू ख्रिस्ताची ॥३७॥ तिनें ह्या रजपूतिणीला । रीतीप्रमाणें उपचार केला । लोबो म्हणे ना लागला । मार इला कोठेंच ॥३८॥ हें आश्चर्य खरोखर । खांब दगडाचा होता थोर । त्याच्या खालीं शरीर । सुरक्षित रहावें कसें ॥३९॥ आश्चर्य वाटलें लोकांला । प्राण बाईचा वांचला । हा जो कांहीं प्रकार झाला । तो घडला इतुक्यास्तव ॥४०॥ खांब पाडून अंगावरी । भूत जें होतें शरीरीं । त्या भूतास मुक्ति खरी । दिधली त्या गजाननें ॥४१॥ बाई होऊन पूर्ववत । गेली जयपूर शहराप्रत । नांदूं लागली आनंदांत । ऐसा प्रभाव स्वामीचा ॥४२॥ ऐसेंच एका उत्सवाची । नाईक नवऱ्याच्या मस्तकांसी । सोडीत असतां मंडपासी । लाकडी गोल पडला हो ॥४३॥ तोही गोल थोर होता । परी स्वामीची अगाध सत्ता । कोठेंही ना आघात होतां । नाईक नवरा वांचला ॥४४॥ पुत्र कृष्णाजी पाटलाचा । रामचंद्र नांवाचा । परमभक्त समर्थांचा । एक असे शेगांवीं ॥४५॥ एके दिवशीं त्याच्या घरीं । येते झाले साक्षात्कारी । ऐन दुपारच्या अवसरीं । गोसाव्याच्या रुपानें ॥४६॥ भूक लागलि मला देखा । अन्न कांहीं देतां कां ? । ऐसें म्हणून मारिली हांका । रामचंद्र पाटलातें ॥४७॥ पाटील मूळचा भाविक । त्याची वाटलें कौतुक । गोसाव्याची ऐकून हांक । दारामाजीं पातला ॥४८॥ निरखून पाहातां गोसाव्यासी । तों ते असावे पुण्यराशी । स्वामी गजानन निश्चयेंसी । ऐसें त्याला वाटलें ॥४९॥ गोसाव्याचा धरुन हात । आला घेऊन घरांत । दिला बसण्या पाट । पूजा केली पायांची ॥५०॥ गोसावी म्हणे पाटलाला । आज मी मुद्दाम आलों मुला । कांहीं तुज सांगण्याला । तें तूं ऐके मनापून ॥५१॥ कर्जाची न चिंता करी । तें फिटून जाईल निर्धारीं । अरे उन्हाळ्यांत गोदावरी । थोडी कोरडी पडतसे ॥५२॥ तैसाच हाही प्रकार । संपन्नतेचा येईल पूर । कृपाघन वर्षल्यावर । श्रीहरीचा समज हें ॥५३॥ उष्टें माझे जें ठायीं । पडेल बापा तें ठाई । कशाचेंही कधीं पाही । कमी नाहीं पडणार ॥५४॥ आण ताट वाढून । सुग्रास देई भोजन । मर्जी असल्या पांघरुण । घाल एखादें अंगावरी ॥५५॥ पूजा अन्न दक्षिणा । याचकांसी दिल्या

जाणा । तें पावतें नारायणा । येविषयीं शंका नसे ॥५६॥ परी तो याचक । आधीं पाहिजे शुद्ध देख । त्यावांचून हें कौतुक । होणार नाहीं कधींही ॥५७॥ आणलें ताट वाढूनी । गोसावी जेवला प्रेमानीं । पांच रुपये पाटलांनीं । दक्षिणा ठेविली त्याच्या करां ॥५८॥ तैं गोसावी म्हणाला । ही दक्षिणा नको मला । तूं पाहिजे कारभार केला । गजाननाच्या मठांत ॥५९॥ तीच दक्षिणा मागण्यासी । मी आलों तुझ्यापासीं । ती आनंदें देई मसी । म्हणजे कल्याण होईल ॥६०॥ समर्थसेवेची दक्षिणा । देऊन तुष्टवी माझ्या मना । योग्य मनुष्य तुझ्याविणा । कोणी न येथें सांप्रत ॥६१॥ तुझी कांता आजारी । वरचेवरी पडते जरी । तीही होईल बापा परी । ही दक्षणा दिल्यानें ॥६२॥ बोलाव तुझ्या पुत्राप्रत । त्याच्या कंठीं एक ताईत । बांधितों म्हणजे चेटूकभूत । याचीन बाधा होय त्यासी ॥६३॥ का कीं ही जमेदारी । कठीण आहे भूमीवरी । पाण्याशींच पाणी वैरी। ये ठाई होत असे ॥६४॥ पाटीलकीचें तुझें वतन । हें वाघाचें पांघरुण । त्याचा उपयोग करणें जाण । अति जपून रामचंद्रा ॥६५॥ द्वेषी मन असूं नये । सन्नीतीला सोडूं नये । राजाविरुद्ध जाऊं नये । उगीच भलत्या कामांत ॥६६॥ साधु कोण संत कोण ? । हें पाहावें शोधून । दांभिकांच्या नादीं जाण । कदापीही लागूं नये ॥६७॥ हीं व्रतें पाळल्यास । तुझा ऋणी श्रीनिवास । होईल या वचनास । असत्या माझ्या मानूं नको ॥६८॥ आय पाहून खर्च करी । दंभाचार कधीं न वरी । साधुसंत येतां घरीं । विन्मुख त्याला लावूं नये ॥६९॥ अपमान खऱ्या संतांचा । झाल्या कोप ईश्वराचा । होतसे बापा साचा । संतचरणीं प्रेमा धरीं ॥७०॥ आपल्या वंशजाचें उणें । पाहूं नये कदा मनें। सोयऱ्याधायऱ्यांकारणें । समयानुसार मान द्यावा ॥७१॥ कोप असावा बाह्यात्कारी । दया असावी अंतरीं । जैसें का तें फणसावरी । कांटे आंत गोड गरे ॥७२॥ मी तुझ्या पाठीस । आहे जाण रात्रंदिवस । ताईत बांधून कंठास । गोसावी जाऊं लागला ॥७३॥ दाराबाहेर जातां भला । अंतर्धान पावला । पाहातां पाहातां झाला । दिसेनासा रस्त्यांत ॥७४॥ पाटील अवघ्या दिवसभर । मानसीं करी विचार । हा गोसावी कोणी इतर । नसावा ऐसें वाटतें ॥७५॥ श्रीगजाननस्वामी मला । आले उपदेश

करायाला । घेऊन गोसावीवेषाला । हें आतां समजलें ॥७६॥ रात्रीं स्वप्नीं येऊन । संशय केला निरसन । ऐसें स्वामीगजानन । भक्तवत्सल खरोखरी ॥७७॥ श्रीगजानन चरित्र । तारक असोनी परमपवित्र । अनुभव येण्या मात्र । सबळ निष्ठा पाहिजे ॥७८॥ या ग्रंथाची अवतरणिका । देतों आतां ही तुम्ही ऐका । वेळ उगा दवडूं नका । पूर्ण व्हावें सावधान ॥७९॥ प्रथमाध्यायीं मंगलाचरण । देवगुरुचें वंदन । केलें पुढें निवेदन । गजाननाच्या पूर्वचरिता ॥८०॥ माघमासीं सप्तमीसी । समर्थ आले शेगांवासी । देवीदासाच्या सदनापासीं । दिसते झाले प्रथमतः ॥८१॥ बंकटलाल दामोदर । दोन होते चतुर नर । त्यांनीं परीक्षा अखेर । केली गजाननाची ॥८२॥ कथा द्वितीयाध्यायांत । येणेंपरी आहे सत्य । गोविंदबुवाच्या कीर्तनांत । महाराज येऊन बैसले ॥८३॥ पितांबर शिंप्याला । रस्त्यांत चमत्कार दाविला । बंकटलालाच्या घराला । महाराज गेले शेवटीं ॥८४॥ कथा तृतीयाध्यायाला । गोसाव्यानें नवस केला । गांजाचा श्रीसमर्थाला । पाजण्याचा विबुध हो ॥८५॥ त्याची इच्छा पुरविली । प्रथा गांजाची पडली । तेथपासोनी भली । शेगांवचे मठांत ॥८६॥ जानराव देशमुखाचें । गंडांतर टाळिलें साचें । देऊन तीर्थ पायांचें । आपुलें तें स्वामींनीं ॥८७॥ मृत्यूचे ते प्रकार । तेथें कथिले सविस्तर । तुकारामासी दिला मार । ढोंग करितो म्हणोनी ॥८८॥ कथा चतुर्थाध्यायाठायीं । येणें रीतीं असे पाही । जानकीरामें दिला नाहीं । विस्तव चिलमीकारणें ॥८९॥ किडे पडले चिंचवण्यांत । अन्न गेलें वायां सत्य । सोनारानें जोडून हात । केली विनंती समर्थांला ॥९०॥ त्याचा अपराध क्षमा केला । पूर्ववत् केले चिंचवण्याला । जानकीराम भक्त झाला । ते दिवसापासून ॥९१॥ होते दोन कान्होले । उतरंडीसी ठेविलेले । तेच समर्थें मागितले । खाया चंदू मुकिंदासी ॥९२॥ चिंचोलीच्या माधवाला । यमलोक दावून मुक्त केला । शिष्याहातें करविला । थाट वसंतपूजेचा ॥९३॥ कथा पंचमाध्यायांत । महाराज पिंपळगांवांत । बसले शंकराच्या मंदिरांत । पद्मासन घालोनियां ॥९४॥ गुराख्यांनीं पूजा केली । गांवची मंडळी तेथें आली । महाराजांसी घेऊन गेली । पिंपळगांवाकारणें ॥९५॥ हें कळलें

बंकटलाला । तो पिंपळगांवास गेला । महाराजासी आणण्याला । परत शेगांवाकारणें ॥९६॥ समर्थासी आणले परत । कांहीं दिवस राहून तेथ । पुन्हां गेले अकोलींत । भास्करासी तारावया ॥९७॥ कोरडया ठणठणीत विहिरीला । जिवंत झरा फोडीला। एका क्षणांत आणिलें जला । त्या कोरडया विहिरी ठायीं ॥९८॥ भास्कराची उडवलि भ्रांती। घेऊन आले तयाप्रती । शेगांवास गुरुमूर्ति । ही कथा पंचमांत ॥९९॥ ष्ठाध्यायीं ऐसी कथा । बंकटलालें सद्गुरुनाथा । मक्याचीं कणसें खाण्याकरितां । नेलें आपुल्या मळ्यांत ॥१००॥ गांधीलमाशा उठल्या तेथ । लोक होऊन भयभीत । पळूं लागले असती सत्य । जीव आपुला घेऊनी ॥१॥ बाधा गांधीलमाश्यांची । महाराजा न झाली साची । घेतली असे शिष्यत्वाची । परीक्षा बंकटलालाची ॥२॥ नरसिंगजीस भेटण्याला । स्वामी गेले अकोटाला । जो नरसिंगजी होता भला । शिष्य कोतशा अल्लीचा ॥३॥ कांहीं दिवस राहिले । अकोटामाजीं भले । नरसिंगजीसी हितगुज केलें । बंधु आपुला म्हणून ॥४॥ चंद्रभागेच्या तीरीं । शिवरग्रामाभीतरीं । कृपा व्रजभूषणावरी । केली असें जाऊन ॥५॥ रुतीच्या मंदिरांत । श्रावणमासाच्या उत्सवांत । समर्थ आले राहण्याप्रत । येथें षष्ठमाची पूर्तता ॥६॥ गांवींची पाटीलमंडळी । अवघी आडदांड होती भली । हमेश होई बोलाचाली । त्यांची समर्थाबरोबर ॥७॥ हरि पाटलासवें भले । महाराज कुस्ती खेळले । मल्लविद्येचें दाविलें । प्रत्यंतर बहुताला ॥८॥ उंसाचा चमत्कार । दाऊनियां साचार । अभिमानाचा परिहार । केला पाटील मंडळींच्या ॥९॥ भिक्यानामें दिला सुत । खंडू कडताजी पाटलाप्रत । आम्रभोजनाचें व्रत । चालविण्यास कथिलें पाटलाला ॥११०॥ ऐशा कथा सप्तमाध्यायीं । कथन केल्या आहेत पाही । निष्ठा समर्थांच्या ठायीं । जडली पाटीलमंडळींची ॥११॥ कथा आहे अष्टमांत । दुफळी पाटील देशमुखांत । अर्ज दिधला सरकारांत । महारांनीं विरुद्ध पाटलाच्या ॥१२॥ खंडूवरी बालंट आलें। तें समर्थांनीं नासिलें । निर्दोष सुटते झाले । खंडू पाटील खटल्यांतून ॥१३॥ तेलंगी ब्राह्मणाला । वेद म्हणून दाखविला । आपण कोण हा कळविला । सहज लीलेनें समाचार ॥१४॥ कृष्णाजीच्या



https://santgajananbhaktpariwar.in/

मळ्याशीं । महाराज राहिले छपरासी । मंदिराच्या सान्निध्यासी । चंद्रमौळी हराच्या ॥१५॥ ब्रह्मगिरी गोसाव्याला । अभिमानविरहित केला । "नैनं छिन्दन्ति" श्लोकाला । रहस्यासह सांगून ॥१६॥ जळत्या पलंगाच्यावर । महाराज बसते झाले स्थिर । न जाळे वैश्वानर । केव्हांही खऱ्या संताला ॥१७॥ कथा नवमाध्यायाला। द्वाड घोडा शांत केला । खूण नवस करणाराला । दिली असे गांजाची ॥१८॥ दासनवमीचे उत्सवासी। समर्थ बाळापुरासी । घेऊन आपल्या शिष्यांसी । बाळकृष्णाच्या घरां गेले ॥१९॥ बाळकृष्णालागून । करविलें समर्थाचें दर्शन । संशयरहित केलें मन । तया रामदास्याचें ॥१२०॥ दशमाध्यायीं सुरेख । उमरावतीचें कथानक । उपरति झाली पुरी देख । तेथें बाळाभाऊला ॥२१॥ गणेश आप्पा चंद्राबाई । यांनीं अर्पिला संसार पाई । भावभक्तीनें लवलाही । जाननस्वामीच्या ॥२२॥ गणेश दादा खापडर्याला । शुभ आशीर्वाद दिधला । छत्रीनें मारुन बाळाला । परीक्षा त्याची घेतली ॥२३॥ द्वाड गाय सुकलालाची । अति गरीब केली साची । दांभिक भक्ति घुडयाची । कशी ती कथन केली ॥२४॥ एकादशाध्यायीं कथन । भास्करासी डसला श्वान । आले त्र्यंबकेश्वरीं जाऊन । गोपाळदासा भेटले ॥२५॥ झ्यामसिंगाच्या विनंतीसी । देऊन मान अडगांवासी । येते झाले पुण्यराशी । श्रीगजाननमहाराज ॥२६॥ निजधामा भास्कर गेला । त्याचा देह ठेविला । द्वारकेश्वरासन्निध भला । सतीबाईचे शेजारीं ॥२७॥ आज्ञा केली कावळ्यांला । तुम्ही न यावें या स्थला । वांचविले गणु जवऱ्याला । सुरुंग उडतां विहिरींत ॥२८॥ शेट बचुलालाची । कथा द्वादशाध्यायीं साची । मूर्ति निरिच्छपणाची । प्रत्यक्ष होते महाराज ॥२९॥ स्वामीचें वस्त्र नेसला । पितांबर शिंपी कोंडोलीला । स्वइच्छेनें येता झाला । परमभक्त होता जो ॥१३०॥ पितांबरानें कोंडोलीसी । बळिरामाच्या शेतासी । वठलेलिया आंब्यासी । पानें फळें आणविलीं ॥३१॥ पितांबर राहिला कोंडोलींत । तेथेंच झाला समाधिस्थ । नव मठ झाला स्थापित । शेगांवीं समर्थ इच्छेनें ॥३२॥ विचार करुनी मानसीं । बसून रेतीच्या गाडीसी । महाराज नव्या मठासी। आले जुन्या



https://santgajananbhaktpariwar.in/

मठांतून ॥३३॥ इयामसिंगानें मुंडगांवाला । नेलें गजाननस्वामीला । पर्जन्यानें घोटाळा । भंडाऱ्याचा केला असे ॥३४॥ इयामसिंगानें आपुली । इस्टेट समर्था अर्पिली । पुंडलिकाची निमाली । गांठ प्लेगची श्रीकृपें ॥३५॥ कथाभाग तेराव्याचा । महारोग गोसाव्याचा । हरण गंगाभारतीचा । केला असें गजाननें ॥३६॥ बंडुतात्यासी भाग्य आलें । भूमींत धन सांपडलें । कर्जापासून मुक्त केलें । समर्थानें निजकृपें ॥३७॥ नर्मदेच्या स्नानास । सोमवती अमावास्यास । नौका फुटतां छिद्रास । हात लाविला नर्मदेनीं ॥३८॥ विडा माधवनाथाला । शिष्याहातीं पाठविला । या कथा चवदाव्याला । वर्णिल्या असती साकल्यें ॥३९॥ अध्याय तो पंधरावा । शिवजयंतीचा आहे बरवा । आले अकोले नामक गांवा । टिळक बाळ गंगाधर ॥१४०॥ भाकरी प्रसाद पाठविला । कोल्हटकराचे हस्तें भला । मुंबईत लोकमान्याला । ग्रहण करायाकारणें ॥४१॥ श्रीधर गोविंद काळ्यास । करिते झाले उपदेश । नको जाऊं विलायतेस । येथेंच आहे सर्व कांहीं ॥४२॥ कथा ऐशा सोळाव्यासी । पुंडलीक अंजनगांवासी। जातां निवारिले त्यासी । येऊनिया स्वप्नांत ॥४३॥ पादुकाचा प्रसाद त्याला । इयामसिंगहस्तें पाठविला । कवराच्या भाजीभाकरीला । ग्रहण केलें आनंदें ॥४४॥ छरा तुकारामाचा । कानामधून पडला साचा । ह्या अशा कथांचा । समावेश सोळाव्यांत ॥४५॥ सतराव्यांत कथा सुरस । विष्णूसाच्या घरास । जाया मलकापुरास । समर्थ निघाले गाडींतून ॥४६॥ नग्न फिरती म्हणूनी । खटला भरला पोलिसांनीं । केवळ अहंपणानीं । सत्पुरुषासी त्रास द्याया ॥४७॥ महताबशा सांईला । पाठवून दिलें पंजाबाला । हिंदुयवनांविषयीं केला । कळकळीचा बोध त्यासी ॥४८॥ बापुरावाच्या कांतेसी । भानामती न मानी साची । भेट गंगाभागीरथीसी । झाली अकोटीं विहिरींत ॥४९॥ कथा बायजा माळणीची । अठराव्यामाजीं साची । कवर डॉक्टरच्या फोडाची । कथा यांत ग्रथित असे ॥१५०॥ महाराज गेले पंढरीला । घेऊन अवघ्यां लोकांला । तेथें बापुना काळ्याला । दर्शन हरीचें करविलें ॥५१॥ कवठे बहादुरचा वारकरी । मरीनें झाला आजारी । त्यास घटकेमाझारीं । समर्थानें बरें केलें ॥५२॥



https://santgajananbhaktpariwar.in/

एक्या कर्मठ ब्राह्मणाला । श्वान उठून मेलेला । दाऊन त्याचा गलित केला । कर्माभिमान श्रोते हो ॥५३॥ कथा एकोणविसाव्यासी । दिला काशीनाथपंतासी । आशीर्वाद तो अतिहर्षी । तो येता दर्शना ॥५४॥ गोपाळ मुकिंद बुटी भला । नागपुरासी घेऊन गेला । श्रीगजाननस्वामीला । आपुल्या गेहाकारणें ॥५५॥ त्याच्या मनीं ऐसा हेत । महाराज ठेवावें नागपुरांत । परी हरि पाटलांनीं परत । आणिले समर्थ शेगांवीं ॥५६॥ धार-कल्याणचे रंगनाथ । साधु आले भेटण्याप्रत । समर्थासी शेगांवांत । ऐसे आणि कितीतरी ॥५७॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । जो कर्ममार्गाची प्रत्यक्ष मूर्ति । दृष्टादृष्ट होतां नुसती । आनंद झाला उभयतातें ॥५८॥ तेव्हां बाळाभाऊला । जो कां होता संशय आला । तो समर्थांनीं निवटिला । करुनियां उपदेश॥५९॥ केलें खळ्याचें संरक्षण । गाढवाचे पासून । समर्था मारितां आलें मरण । नारायणासी बाळापुरीं ॥१६०॥ गजाननाचे कृपें भलें । जाखडयाचें लग्न झालें । कपीलधारेसी दिधलें । दर्शन निमोणकराला ॥६१॥ तुकारामें आपुला । पुत्र समर्था वाहिला । नारायण नामें भला । सेवा करावयाकारणें ॥६२॥ पंढरीतें जाऊन । विठ्ठलातें विचारुन । महाराज आले परतून । शेगांवाकारणें ॥६३॥ पुढें भाद्रपदमासासी । ऋषि-पंचमीच्या पुण्य दिवशीं । आधुनिक कालाचा हा ऋषि । समाधिस्त जहाला ॥६४॥ विसाव्यामाजीं इतर । श्रींची समाधि झाल्यावर । जे का घडले चमत्कार । त्यांचें वर्णन केलें असे ॥६५॥ जे जे भाविक भक्त कोणी । त्यांना त्यांना अजुनी । दर्शन देती कैवल्यदानी । त्यांच्या इच्छा पुरवून ॥६६॥ आतां हा एकविसावा । अवघ्या कथेचा कळस बरवा । अवघ्यांचा लेखावा । तुम्ही सार श्रोते हो ॥६७॥ प्रत्यक्षापरी प्रकार । येथें होती वरच्यावर । म्हणून म्हणणें आहे सार । अवघ्यांचें या अध्याया ॥६८॥ वर्गणीच्या जोरें भलें । समाधीचें काम झालें । मनापासून भक्त झटले । वर्गणी गोळा कराया ॥६९॥ ऐसें भव्य सुंदर । काम कोठें न भूमीवर । धर्मशाळा चौफेर । चहूं बाजूंनीं बांधिल्या ॥१७०॥ या भव्य कामाला । बहुतांनीं हात लाविला । त्यांचीं नांवें तुम्हांला । सांगतां ग्रंथ वाढेल ॥७१॥ मुख्य जे होते त्यांतून । त्यांचीं नांवें

करितों कथन । कुकाजीचा नंदन । हरी पाटील नाम ज्याचें ॥७२॥ सांगवी गांवचा बनाजी । उमरीचा तो गणाजी । बटवाडीचा मेसाजी । लाडेगावचा गंगाराम ॥७३॥ भागू, नंदू, गुजाबाई । अकोल्याची बनाबाई । सुकदेव पाटलाची ती आई । यांनीं हजारों रुपये दिले ॥७४॥ पाटील रामचंद्र कृष्णाजी । दुसरा दत्तु भिकाजी । पळसखेडचा सुखदेवजी । मार्तन्ड गणपती शेगांवचा ॥७५॥ बालचंद्राचा रतनलाल । पंचगव्हाणचा दत्तुलाल । त्याच गांवींचा बिसनलाल । अंबरसिंग टाळकीचा ॥७६॥ किसन बेलमंडळेकर । विठोबा पाटील चावरेकर । हसनापुरचा राहणार । गंगाराम नाम ज्याचें ॥७७॥ या दानशूरांनीं । मोठमोठया रकमा देऊनी । केली मठाची उभारणी । भक्तिस्तव समर्थांच्या ॥७८॥ कोठया कचेरी स्वैंपाकघरें । सोपे उत्तम प्रकारें । बांधिले असती साजिरे । समाधीच्या चौफेर ॥७९॥ लोकांनीं ज्या देणग्या दिल्या । त्या बांधकामीं जिरुन गेल्या । परी पुष्कळ गोष्टी राहिल्या । बांधण्याच्या अवशेष ॥१८०॥ त्यासाठीं युक्ति केली । वर्गणी जमवण्यासाठीं भली । योजना ती ऐशी झाली । ती ऐका विबुध हो ॥८१॥ बसविला शेतसाऱ्यावर । समर्थांचा धार्मिक कर । कोणासी न करितां जोर । रुपयामागें एक आणा ॥८२॥ तैशीच बाजारपेठेशीं । धान्य अथवा कपाशी । जी येईल विकायासी । पट्टी बसविली त्यावर ॥८३॥ गाडीमागें अर्धा आणा । हर्ष वाटे देतांना । कां कीं समर्थांच्या चरणां । निष्ठा होती सर्वांची ॥८४॥ समाधीपुढें स्वाहाकार । होऊन गेले अपार । परी त्यांतून मोठे चार । सर्वश्रुत जाहले ॥८५॥ शतचंडीचें अनुष्ठान । ब्राह्मणांच्या करवीं जाण । केलें आदरेंकरुन । किसनलाल शेठजीनें ॥८६॥ अनुष्ठान शतचंडीचें । करणें अति अवघड साचें । अधिकशून्य ना खपायाचें । जगदंबे कालिकेस ॥८७॥ कांहीं चुकतां विधानांत । तात्काळ होतें विपरीत । काम्य अनुष्ठानाप्रत । भीति चहूं बाजूंनीं ॥८८॥ वडील किसनलालाचा । बंकटलाल नांवाचा । भक्त होता समर्थांचा । एकनिष्ठ पहिल्यापून ॥८९॥ पूर्ण आहुतीच्या दिवशीं । त्या बंकटलाल भक्तासी । व्याधि उद्भवली शरीरासी । प्राणांताचा समय आला ॥१९०॥ लोक गेले घाबरुन । म्हणती हें काय आलें विघ्न । शतचंडीचें अनुष्ठान ।

करतां विपरीत व्हावें कां ? ॥९१॥ बंकटलाल म्हणे पुत्रासी । भिऊं नकोस मानसीं । माझा तारिता पुण्यरासी । समाधीसी बसलासे ॥९२॥ तो अवघें करील बरें । नका होऊं बावरें । पूर्ण आहुतीचें काम सारें । घ्यावें सशास्त्र उरकून ॥९३॥ माझा स्वामी गजानन । येऊं न देई कदा विघ्न । भक्ताचें करण्या संरक्षण । मुळींच बसला येथें तो ॥९४॥ तेंच पुढें सत्य झालें । व्याधीचें स्वरुप मावळलें । एका बाईचें निमालें । भूत शतचंडींत या ॥९५॥ बनाजी तिडके सांगवीकर । यांनीं केला स्वाहाकार । कसुऱ्याची रहाणार । गुजाबाई नाम जिचें ॥९६॥ चापडगांवींचा वामन । शामरावाचा नंदन । यांनींही एक यज्ञ । केला समाधीच्या पुढें ॥९७॥ ऐसीं धर्मकृत्यें किती तरी । झालीं समर्थासमोरी । खरे खरेच साक्षात्कारी । श्रीगजाननमहाराज ॥९८॥ यावत् कालपर्यंत । लोक होते निष्ठावंत । तावत् कालपर्यंत । वऱ्हाड होता सुखी बहु ॥९९॥ जसजसी निष्ठा कमी झाली । तों तों विपन्न दशा आली । अवदसेनें घातली । माळ कंठीं वऱ्हाडाच्या ॥२००॥ विपुल पिकणें टाकिलें । काश्यपीनें पहा भले । नवे वाहूं लागले । वारे सर्व वऱ्हाडांत ॥१॥ वऱ्हाडाची ऐसी दैना । समर्थांसी पाहवेना । म्हणून घेतलें आपणां । कोंडोनीं त्यांनीं जलांत ॥२॥ तीस फुटांपासून । पाया आणिला भरुन । तेथेंच कां हें जीवन । निर्माण व्हावें श्रोते हो ॥३॥ म्हणून ऐसें वाटतें । राग आला समर्थांतें । म्हणून त्यांनीं जलातें । भोंवतीं केलें निर्माण ॥४॥ सुखसंपन्न पहिल्यापरी । वऱ्हाड व्हावा निर्धारी । ऐसें चित्तांत असल्या जरी । या वऱ्हाडी जनांच्या ॥५॥ तरी त्या अवघ्या जनांनीं । श्रीगजाननाच्या चरणीं । पूर्ववत् निष्ठा ठेवूनी । सुखालागीं अनुभवावें ॥६॥ ऐसें न जरी करतील । तरी याहीपेक्षां येईल । वऱ्हाडासी बिकट काळ । याचा विचार करा हो ॥७॥ गजाननपदीं निष्ठा ठेवा । सुख-अनुभव सर्वदा घ्यावा । कुतर्कासी मुळीं न द्यावा । ठाव आपुल्या मानसीं ॥८॥ या गजाननरुप जमिनींत । जें जें कांहीं पेराल सत्य । तें तें मिळणार आहे परत । बहुत होऊन तुम्हांला ॥९॥ दाणे टाकिल्या खडकावरी । त्यांचीं न रोपें होतीं खरीं । याचा विचार अंतरीं । सर्व काळ करा हो ॥२१०॥ कंटाळा संतसेवेचा । ज्या

ज्या प्रांता येत साचा । त्या त्या प्रांतीं दुष्काळाचा । प्रादुर्भाव होतसे ॥११॥ धर्मश्रद्धा ही वाघीण । गेल्या मनरुपी दरींतून । दुर्वासनेचे कोल्हे जाण । येऊन बसतील ते ठायां ॥१२॥ भक्ति शुचिर्भूत अंगना । अभक्ति वारांगना । तिच्या नादीं लागल्या जाणा । विटंबनाच सर्वत्र ॥१३॥ सन्नीतीला सोडूं नका । धर्मवासना टाकूं नका । शत्रु न माना एकमेकां । तरीच शक्ति वाढेल ॥१४॥ ऐसें तुम्ही वागल्यास । येतील चांगले दिवस । या वऱ्हाड प्रांतास । हें कधींहि विसरुं नका ॥१५॥ एकदां तरी वर्षांतून । घ्यावें गजाननाचें दर्शन । एकदां तरी पारायण । करा गजाननचरित्राचें ॥१६॥ हा एकवीस अध्यायांचा । गजाननविजय नांवाचा । नैवेद्य एकवीस मोदकांचा । गजाननासी अर्पा हो ॥१७॥ वा हे अध्याय साचार । माना एकवीस दुर्वांकुर । पारायणरुपें निरंतर । वाहाव्या गजाननासी ॥१८॥ सद्भाव जो मानवाचा । तोच दिवस चतुर्थीचा । प्रेमरुपी चंद्राचा । उदय झाला पाहिजे ॥१९॥ मग या ग्रंथाचें अक्षर । एकेक हें दुर्वांकुर । अर्थ शब्दाचा साचार । मोदक समजा विबुध हो ॥२०॥ तो अर्पून गजानना । पारायणरुपी पारणा । साधून घ्यावा करा ना । वेळ आतां थोडकाही ॥२१॥ हा ग्रंथ ना कादंबरी । ती गजाननाची लीला खरी । येथें जो अविश्वास धरी । तो बुडेल निःसंशय ॥२२॥ श्रीगजाननस्वामी चरित्र । जो नियमें वाचील सत्य । त्याचे पुरतील मनोरथ । गजाननकृपेनें ॥२३॥ हें गजाननचरित्र भागीरथी । कथा या तोय निश्चिती । महाराष्ट्र ओंव्या तयावरती । लहरी समजा विबुध हो ॥२४॥ वा कल्पवृक्ष हें स्वामीचरित्र । शाखा अध्याय तयाप्रत । पद्मरचना हीच सत्य । पालवी या वृक्षाची ॥२५॥ जो या ग्रंथीं ठेवील भाव । त्यासी पावेल स्वामीराव । संकटीं त्याच्या घेईल धांव । रक्षण त्याचें करावया ॥२६॥ हा ग्रंथ केवळ चिंतामणी । चिंतिलें फळ देईल जाणी । दृढतर विश्वास असल्या मनीं । हें मात्र विसरुं नका ॥२७॥ जेथें गजाननचरित्राचा । पाठ होईल नित्य साचा । तेथें वास लक्ष्मीचा । चिरकाल होईल हो ॥२८॥ दारिद्र्यासी मिळेल धन । रोगीयासी आरोग्य जाण । साध्वी स्त्रीचें वांजपण । फिटेल याच्या वाचनें ॥२९॥ निपुत्रिकासी होईल पुत्र । निष्कपटी



https://santgajananbhaktpariwar.in/

मिळेल मित्र। चिंता न राहील अणुमात्र। या ग्रंथाच्या वाचका ॥२३०॥ दशमी एकादशी द्वादशीला। हा ग्रंथ जो वाची भला। अनुपम येईल भाग्य त्याला। श्रीगजाननकृपेनें ॥३१॥ गुरुपुष्य योगावरी। जो याचें पारायण करी। बसून एक्या आसनावरी। राहूनियां शुचिर्भूत ॥३२॥ त्याच्या अवघ्या मनकामना। खचित होतील पूर्ण जाणा। कसल्याही असोत यातना। त्या त्याच्या निरसतील ॥३३॥ जेथें हा राहील ग्रंथ। तेथें न कदा येई भूत। लाग न साधे यत्किंचित। तेथें ब्रह्म समंधाचा ॥३४॥ ऐसें याचें महत्त्व। ये भाविकाला प्रचीत। कुटिलदुष्टदुर्जनांप्रत। याचा अनुभव येणें नसे ॥३५॥ मानसाची योजना। राजहंसासाठीं जाणा। तैसें हें संतसज्जनां। मानस स्वामीचरित्र ॥३६॥ पूर्वकालीं ज्ञानेश्वर। मीरा मेहता कबीर। नामा सांवता चोखा महार। गोरा बोधला दामाजी ॥३७॥ उंबरखेडी ऐनाथ। सखाराम अंमळनेरांत। वा देव मामलेदार यशवंत। वा हुमणाबादी माणिकप्रभू ॥३८॥ तेवींच हा वऱ्हाडांत। गजाननस्वामी सद्गुरुनाथ। फरक नाहीं यत्किंचित। त्यांच्या यांच्या मधीं हो ॥३९॥ आतां हीच विनंति। तुम्हां अवघ्यां भाविकांप्रती। अत्यंत असू द्यावी प्रीति। श्रीगजाननांचे चरणीं ॥२४०॥ म्हणजे तुमची येरझार। जन्ममृत्यूची साचार। होऊनियां व्हाल पार। दुस्तर भवामधूनी ॥४१॥ आतां स्वामी दयाघना !। तुला येवो माझी करुणा। दासगणूच्या यातना। सकल निवारी कृपेनें ॥४२॥ मी तुझा झालों भाट। मार्ग दावी मला नीट। दुर्वासनेचा येतो वीट। चित्तामाजीं दयाळा ! ॥४३॥ आमरण वारी घडो। संतचरणीं प्रेमा जडो। अक्षय्यीचा वास घडो। श्रीगोदेच्या तीराला ॥४४॥ प्रसंग याचना करण्याचा। मशीं नको आणूंस साचा। समर्था दासगणूचा। अभिमान वाहावा मानसीं ॥४५॥ मी सकल संतांचा चरणरज। माझी राखा तुम्ही लाज। हेंचि मागणें आहे आज। पदर पसरुन तुम्हांतें ॥४६॥ जैसी केलीस प्रेरणा। तैसेंच मी वदलों जाणा। हे स्वामी गजानना !। तुझें चरित्र लिहितां कीं ॥४७॥ शेगांवचे मठांत। कांहीं होतें कागदपत्र। ते रतनसातें मजप्रत। आणूनियां दाखविले ॥४८॥ त्यांच्या आधारें ग्रंथ लिहिला। कल्पनेच्या ना उपयोग केला। म्हणून अधिक न्यूनाला।



https://santgajananbhaktpariwar.in/

मी नाहीं कारण ॥४९॥ झालें असल्या अधिकऊन । त्याची क्षमा गजानन । करो सर्वदा मजलागून । हीच आहे विनंती ॥२५०॥ शके अठराशें एकसष्टांत । प्रमाथिनाम संवत्सरांत । चैत्रमासीं शुद्धांत । वर्षप्रतिपदेला ॥५१॥ हा ग्रंथ कळसा गेला । शेगांव-ग्रामीं भला । तो गजाननांनीं पूर्ण केला । प्रथम प्रहरीं बुधवारीं ॥५२॥ स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा गजाननविजय नामें ग्रंथ । नौका होवो भाविकांप्रत । भवसिंधु तरावया ॥२५३॥ शुभं भवतु ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥

॥ इति एकविंशोऽध्यायः समाप्तः ॥

॥ पुंडलीक वरदा हरिविठ्ठल ॥ ॥ सीताकांतस्मरण जयजय राम ॥ ॥ पार्वतीपते हरहर महादेव ॥

॥समाप्त॥



श्री गजानन महाराज गोसव्याच्या रूपात रामचंद्र पाटलांना भेट देत आहेत.